**MHND250004002022**

| | | |
|---|---|---|
| दाखल केल्याचा दिनांक | – | २०.०४.२०२२ |
| नोंदणी केल्याचा दिनांक | – | २०.०४.२०२२ |
| पारीत केल्याचा दिनांक | – | १८.०३.२०२६ |
| कालावधी | – | वर्ष महिना दिवस<br>०३ १० २६ |

**उमरी येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, उमरी यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी के.एस.कुलकर्णी)**
**नियमीत फौजदारी खटला क्र.७६/२०२२**

**नि.क्र.५२.**

**भाग–अ**

| | |
|---|---|
| **प्रथम खबर तपशिल** | उमरी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. २६२/२०२१ चा भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. |
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत - पोलीस ठाणे अंमलदार,<br>उमरी पोलीस ठाणे, |
| **सरकारी अधिवक्ता** | श्री एन.एम. मगदुम,<br>सहा. सरकारी अभियोक्ता |
| १. | **मुरलीधर जगन्नाथ पुंडगे,**<br>वय– २१ वर्षे, व्यवसाय–शेती. |
| २. | **श्रीधर जगन्नाथ पुंडगे,**<br>वय– १८ वर्षे, व्यवसाय–शेती. |
| ३. | **श्रीकांत बाबुराव पुंडगे,**<br>वय– २८ वर्षे, व्यवसाय–शेती. |
| ४. | **शिवाजी बाबुराव पुंडगे,**<br>वय– २७ वर्षे, व्यवसाय–शेती.<br>सर्व रा.बिजेगाव ता.उमरी जि.नांदेड. |
| **आरोपींतर्फे अधिवक्ता** | श्री. एम. डी. मेहता. |

## भाग–ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०५.१२.२०२१ |
| प्रथम खबरीचा दिनांक | ०६.१२.२०२१ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | २०.०४.२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०४.०९.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १७.१२.२०२४ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १८.०३.२०२६ |
| आदेशाचा दिनांक | १८.०३.२०२६ |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनवर मुक्त केल्याची तारीख | आरोप | दोषी अगर निर्दोष | शिक्षा | फौ.प्र.स. चे कलम ४२८ अन्वये करीताचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुरलीधर जगन्नाथ पुंडगे | १०.१२.२०२१ | फौ.प्र.स.४१ (१) (अ) नोटीस प्रमाणे | भा.द.वी कलम ३२४, ३२३, ५०४, सहकलम ३४ | निर्दोष मुक्त | नाही | - |
| २ | श्रीधर जगन्नाथ पुंडगे | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ३ | श्रीकांत बाबुराव पुंडगे | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ४ | शिवाजी बाबुराव पुंडगे | -- | -- | -- | -- | -- | -- |

# न्यायनिर्णय

## ( पारीत दिनांक १८ मार्च, २०२६ )

आरोपींविरुध्द **भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४, सहकलम ४४** प्रमाणे खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

२. दिनांक ०५.१२.२०२१ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेच्या सुमारास मौजे बिजेगाव ता. उमरी जि. नांदेड येथे फिर्यादी शेतात हळदीला पाणी देणेसाठी पाईप घेवून जात असताना त्यांच्या शेता शेजारील आरोपी क्र.१ ते ४ यांनी त्यांना थांबवुन 'तु आमच्या शेतातुन का जात आहेस' असे म्हणुन शिवीगाळ करुन थापडा बुक्यांनी मारहाण केली. तसेच, आरोपी क्र.१ यांनी त्यांच्या हातातील काठीने डाव्या पायावर मुक्का मार दिला. त्यावेळी सदरचे भांडण व्यंकटी हंबर्डे व विश्वांबर हंबर्डे यांनी सोडवले. त्यामुळे फिर्यादीने उमरी पोलीस स्टेशनला घटनेची फिर्याद दिली.

३. त्याप्रमाणे, उमरी पोलीस ठाणे येथे **गुन्हा नोंद क्र. २६२/२०२१** चा भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो.हे.कॉ. आर.एफ. गेडाम, उमरी पोलीस स्टेशन यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळाचा पंचनामा करुन मुद्देमाल जप्त केला. तपासाअंती त्यांनी आरोपींविरुध्द भा.द.वि कलम ३२४, ३२३, ५०४, सहकलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पुर्वीचे न्यायाधीश यांनी आरोपींविरुध्द भा.दं.वि. **कलम ३२४, ३२३, ५०४, सहकलम ३४** साठी **(नि.क्र.२४)** अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपींस दोषारोप त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले.

५. फिर्यादीच्या साक्षीपुराव्यात आरोपींविरुध्द दोषदर्शित पुरावा मिळून आल्याने, आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ प्रमाणे निवेदन **(नि.क्र.४८ ते ५१)** कडे नोंदवण्यात आले आहेत. आरोपींनी त्यांच्याविरुदध खोटी केस

केली असल्याचा बचाव घेतला आहे.

६. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद, उपलब्ध पुरावा यांचे अवलोकन केल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारासाठी उपस्थित होतात. त्या मुद्दयांवरील निष्कर्ष कारणांसहीत मी खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०५.१२.२०२१ रोजी सायंकाळी ५.३० वाजणेच्या सुमारास बिजेगाव ता. उमरी जि. नांदेड येथे आरोपींनी अपराध करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवुन, आरोपी क्र. १ याने फिर्यादीस काठीने डाव्या पायावर मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३२४ सहकलम ३४ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय? | **नाही.** |
| २. | उपरोक्त नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी अपराध करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवुन, फिर्यादीस लाथाबुक्याने मारहाण करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३२३ सहकलम ३४** अन्वये गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय ? | **नाही.** |
| ३. | उपरोक्त नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी अपराध करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवुन, फिर्यादी, फिर्यादीस शिवीगाळ करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिध्द् केले काय ? | **नाही.** |
| ४. | काय आदेश ? | **आरोपींस दोषमुक्त करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा १ ते ३ साठीः-**

७. मुद्दा क्र.१ ते ३ संबंधीत आलेला अभियोगपक्षाचा पुरावा एकसारखा असून संक्षिप्ततेकरिता मुद्दा क्र.१ ते ३ यांचे मी एकत्रीत विवेचन करुन उत्तर देत आहे.

८. आरोपींवर ठेवलेले आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने सादर केलेल्या साक्षी पुराव्यांचे विवेचन करण्याआधी एक बाब नमुद करणे आवश्यक वाटते ती म्हणजे फिर्यादी **(सा.क्र.१)** व आरोपी यांनी त्यांचेमध्ये **(नि. क्र.४०)** वरील पुरशीस अन्वये आपापसातील भविष्यातील संबंध चांगले रहावेत याकरीता प्रस्तुत प्रकरणात तडजोड झालेली असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे, साक्षी पुरावे हे सदर तडजोडीच्या अनुषंगाने विवेचित करीत आहे.

९. यासदंर्भात, फिर्यादी **(सा.क्र.१)** याने त्यांच्या सरतपासादरम्यान नि.क्र.३० कडील फिर्याद सिद्ध केलेली आहे. परंतु, त्यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान त्यांनी फिर्यादीवर फक्त सही केल्याचे व त्यातील मजकुर त्यांना माहीत नसल्याचे कथन केलेले आहे. त्यामुळे त्यांचा साक्षीपुरावा अभियोगपक्षास उपयुक्त नाही.

१०. तसेच, मधुकर **(सा.क्र.३)**, किशन **(सा.क्र.४)**, व दत्तराम **(सा.क्र.५)** यांनी त्यांच्या सरतपासादरम्यान अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने त्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा उलटतपास घेतला. परंतु, उलटतपासा दरम्यान देखील त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे त्यांचा साक्षीपुरावा अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

११. पंच साक्षीदार गोविंद **(सा.क्र.२)** यांनी त्यांच्या सरतपासादरम्यान **(नि.क्र.३२)** घटनास्थळ पंचनामा सिद्ध केलेला आहे. तसेच, आरोपींच्या विधिज्ञांनी **(नि.क्र.४३)** जप्ती पंचनामा व **(नि.क्र.४४ ते ४७)** कडील वैद्यकिय प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे मान्य केलेले असले तरी फिर्यादी **(सा.क्र.१)** व इतर साक्षीदार यांचा अभियोग पक्षास बळकटी देणारा प्रत्यक्ष पुरावा अभिलेखावर नाही.

१२. कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार फौजदारी खटल्यांमध्ये आरोपींच्या दोषसिध्दीकरीता साक्षीपुराव्यामधुन अपराधाची बाब निसंशयातीतरीत्या सिध्द होणे

अत्यावश्यक आहे. सबब, फिर्यादी **(सा.क्र.१)** व आरोपींमधील झालेल्या तडजोडीच्या अनुषंगाने आलेला अभिलेखावरील पुरावा पाहता मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, आरोपींवर ठेवलेले आरोप सिध्द होत नाहीत. म्हणुन, मी **मुद्दा क्र.** १ **ते** ३ चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**मुद्दा क्र. ४ करीताः-**

**१३.** आरोपींवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द न झाल्यामुळे त्यांना खटल्यामधून दोषमुक्त करणे न्यायोचित आहे. सबब, **मुद्दा क्र. ४** च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपीं क्र.**१. मुरलीधर जगन्नाथ पुंडगे, २. श्रीधर जगन्नाथ पुंडगे,३. श्रीकांत बाबुराव पुंडगे, व ४. शिवाजी बाबुराव पुंडगे,** यांना **भारतीय दंड संहितचे कलम ३२४, ३२३, ५०४, सहकलम ३४** अन्वयेच्या दोषारोपातून भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २७१(१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन कदबे व जात मुचलके रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ अनुसार प्रत्येकी रक्कम **रु.५,०००/–** प्रमाणे जात मुचलका व जामीन कदबा द्यावा.

४. जप्त मुद्देमाल एक गैरी जातीचे खन असलेले अंदाजे दोन फुट लांब, दोन्ही बाजुस खपली निघालेले लाकुड, मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

५. प्रस्तुतच्या न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर)

KULDIP SUBASHRAO KULKARNI
Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2026.03.18 17:30:11 +0530

दिनांक- १८.०३.२०२६.
ठिकाण- उमरी

( के.एस.कुलकर्णी )
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, उमरी.

## परिशीष्ट

## भाग–क

### अभियोगपक्ष/आरोपीपक्ष/न्यायालयापक्षाचे साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नांव | नि.क्र. | प्रकार |
|---|---|---|---|
| १. | अनसाजी शंकर हंबर्डे | २९ | फिर्यादी |
| २. | गोविंद हनमंत हंबर्डे | ३३ | पंच साक्षीदार |
| ३. | मधुकर शंकर हंबर्डे | ३७ | साक्षीदार |
| ४. | किशन शंकर हंबर्डे | ३८ | साक्षीदार |
| ५. | दत्तराम शंकर हंबर्डे | ३९ | साक्षीदार |

### अभियोगपक्ष/आरोपीपक्ष/न्यायालयापक्षा यांचे कागदपत्रांची निशाणी यादी

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| १. | ३२ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ४३ | जप्ती पंचनामा |
| ३. | ४४ ते ४७ | जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्रे |

### भौतिक वस्तु

| अ.क्र. | स्वरुप |
|---|---|
| १. | एक गैरी जातीचे खन असलेले अंदाजे पावने दोन फुट लांबीचे, दोन्ही बाजुस खपली निघालेले लाकुड. |

KULDIP SUBASHRAO KULKARNI
Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2026.03.18 17:30:22 +0530

दिनांक- १८.०३.२०२६.
ठिकाण- उमरी

( के.एस.कुलकर्णी )
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, उमरी.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | G. B. Wavdhane, Stenographer Gr.III (On Deputation) |
| Court | - | CJJD & JMFC Umri |
| Date | - | 18.03.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | - | 18.03.2026 |
| Order uploaded on | - | 20.03.2026 |